सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६८

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)**

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्रमांक : मजनिप्रा/२०१९/विधि विषयक/प्रकरण क्र ९ (२०१९)/२७३

दि. १३/०५/२०२०

प्रकरण क्रमांक ९/२०१९

**PDRO च्या आदेशाच्या विरुध्द खेड (आर्थिक पायाभूत) इकॉनामिक इनफ्रास्टक्चर प्रा. लि. ने केलेले अपीलाविषयी.**

यासोबत दि. १३/०५/२०२० चा मजनिप्रा आदेश क्र. ४ /२०२० जोडला आहे.

सहपत्र: वरीलप्रमाणे

स्वाक्षरित
डॉ. रामनाथ सोनवणे
सचिव, मजनिप्रा

प्रति:— माहितीकरिता व आवश्यक कार्यवाही साठी:—

१. खेड (आर्थिक पायाभूत सुविधा) इकॉनामिक इनफ्रास्टक्चर प्रा. लि. पंजीकृत कार्यालय, ४ था माळा, अमर अविनाश कॉर्पोरेट प्लाझा, बंड गार्डन रोड, पुणे, ४११००१ (अपीलार्थी)

२. ॲड. नचिकेत याज्ञिक, डिएसके लिगल, ॲडव्होकेटस् व सॉलिसिटर्स, सी—१६, धनराज महाल, अपोलो बंदर, छत्रपती शिवाजी मार्ग, कोलाबा, मुंबई, ४००००१ (अपीलार्थीचे वकील)

३. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिचंन भवन बार्ने रोड, पुणे, ४११०११ (प्रतिवादी क्र. १)

४. मे. विंध्याचल हायड्रोपावर लि. २१४, एंपायर हाऊस, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई, ४००००१ (प्रतिवादी क्र. २)

सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६८

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra
Water Resources Regulatory Authority Act, 2005)

**आदेश क्रमांक : ०४/२०२०**

**खालच्या प्रवाहात असलेल्या चासकमान धरणा ऐवजी सरळ चासकमान जलशयातुन १८ दलघमी पाणी घेण्यासाठी परवानगी नाकारण्या विषयी PDRO च्या दि. २५/०४/२०१९ च्या आदेशाविरुध्द खेड इकॉनामिक इनफ्रास्टक्चर प्रा. लि. (के ई आय पी एल) ने दाखल केलेल्या अपीलाबाबत.**

१. खेड (आर्थिक पायाभूत सुविधा) इकॉनामिक इनफ्रास्टक्चर प्रा. लि. पंजीकृत कार्यालय, ४ था माळा, अमर अविनाश कॉर्पोरेट प्लाझा, बंड गार्डन रोड, पूणे, ४११००१

............. **याचिकाकर्ता**

विरुध्द

१. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन बार्ने रोड, पूणे, ४११०११

२. मे. विंध्याचल हायड्रोपावर लि. २१४, एंपायर हाऊस, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई, ४००००१

.................. **प्रतिवादी**

**कोरम :–**

**श्री. के. पी बक्षी अध्यक्ष**

**श्री. व्ही. एम. कुळकर्णी, सदस्य,**

**(ज. सं. अभियांत्रिकी)**

**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधि)**

**डॉ. एस. टी. सांगळे, सदस्य (इकॉनामिक्स)**

**दि. १३/०५/२०२०**

## पार्श्वभूमि

१. खेड आर्थिक पायाभुत सुविधा ( के ई आय पी एल ) अपीलार्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, व कल्याणी ग्रुप ऑफ कंपनी, यांचा संयुक्त उपक्रम, यांनी प्राथमिक तंटा निवारण अधिकारी भिमा खोरे, (PDRO) च्या दि. २५/०४/२०१९ च्या आदेशाने व्यथित होऊन या प्राधिकरणाकडे मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम २२ अंतर्गत अपील केले.

## पार्श्वभूमि

२. चासकमान सिंचन प्रकल्प खेड तालुका, जि. पूणे मधे आहे. प्रकल्प मुलत: सिंचनासाठी बांधले. प्रकल्प अहवालाप्रमाणे या प्रकल्पाचा वार्षिक पाणी वापर २९१.००५ दलघमी असुन त्यात २१. ४०५ दलघमी बाष्पीभवन हानी व बाकीचे पाणी ५५२१४ हेक्टरचे खेड व शिरुर तालुक्यातील लाभक्षेत्राच्या सिंचनासाठी वापरण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, यांनी मे. विंध्याचल हायड्रोपावर लि. प्रतिवादी क्र. २ बरोबर ३०/०६/१९९९ ला चासकमान धरणाच्या खालच्या भागात एक लघु जल प्रकल्प स्थापित करण्याविषयी करार केला. शासनाच्या २०/१२/१९९७ च्या नीतीप्रमाणे स्ववापरासाठी वीज निर्मिती खाजगी क्षेत्रात करण्यासाठी चालना देण्याकरिता हा करार करण्यात आला. हा प्रकल्प २००२ मधे सुरु झाला व अजुनही चालु आहे. सिंचनासाठी देण्यात येणारे पाणी या प्रकल्पाचे मार्गाने दिले जाते. वीज निर्मिती नंतर पाणी परत सिंचन कालव्यात सोडतात.

अशाप्रकारे या लहान प्रकल्पातुन हरित उर्जा तयार होते जी पुनर्नुतनीय स्वरुपाची आहे व ज्यामधे पाणी पुन्हा सिंचनासाठी सोडले जाते.

४. अपीलार्थीने विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्याचा प्रस्ताव दिला आहे ज्यामधे निमगाव दावडी कनेरसर या खेड तालुक्यातील गावात व केंदुर या शिरुर तालुक्यातील गावात खेड शहर प्रकल्पांमधे औद्योगिक क्षेत्रासोबत, निवासी, वाणिज्यीक तथा करमणुक व अन्य सामाजिक पायाभूत सुविधा उभारावयाच्या आहेत. राज्य शासनाने यासाठी त्यांच्या दि. २४/०७/२००८ च्या पत्रान्वये, ज्यासाठी उच्चाधिकार समितिची दि. ०१/०७/२००८ ला सभा झाली होती त्यानुसार, प्रारंभिक मंजुरी दिली आहे. ही मंजुरी ३ वर्षाकरिता होती व नंतर २०११ मधे ती व्यपगत झाली, कारण प्रकल्प प्रस्तावका कडुन याबाबत काहीच हालचाल झाली नव्हती. नंतर अपीलार्थीने प्रतिवादी क्र. १ च्या अधिकाऱ्यांकडे या प्रकल्पासाठी पाणी वाटपाची मागणी केली.

५. अपीलार्थीने त्यांच्या दि. १०/१२/२०१४ च्या पत्राने २२.५० दलघमी पाणी देण्यासाठी कार्यकारी अभियंता, खडकवासला सिंचन विभागाला खेड शहर प्रकल्पासाठी चास धरणातुन पाणी मिळण्यासाठी अर्ज केला. कार्यकारी अभियंता, खडकवासला सिचंन विभाग यांनी त्यावर शेरे दिल्यानंतर दि. १६/०२/२०१५ नुसार सुधारित मागणी १८ दलघमी ची केली.

६. प्रतिवादी क्र. १ चे मुख्य अभियंता यांनी दि. १९/११/२०१८ च्या पत्राने १८ दलघमी पाण्याला संमती दिली, त्यापैकी ११.६० दलघमी पाणी घरगुती वापरासाठी व ६.४० दलघमी औद्योगिक वापरासाठी आहे. अर्जदाराला मंजुर केलेल्या पाण्याचा स्त्रोत लघु जल प्रकल्पाच्या खालच्या प्रवाहात आहे. या मेमोप्रमाणे अर्जदाराला उर्जा निर्मिती नंतर नदीतुन पाणी घ्यावयाचे आहे. ही परवानगी विविध अटींच्या ज्या मेमो मधे दिल्या आहेत, त्यांच्या अधिन राहुन मिळाली आहे. मेमो ची तारीख ही अपीलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्या बरोबर केलेल्या कराराची तारीख समजल्या जाईल.

७. मुख्य अभियंताच्या वर दिलेल्या मेमोच्या आधारावर कार्यकारी अभियंतानी दि. २७/११/२०१८ ला इरादा पत्र (LOI) अपीलार्थींना जारी केले. या इरादापत्राद्वारे अपीलार्थीना मुख्य अभियंताने

मेमो दिल्यापासुन ६ महिन्याच्या आत म्हणजे , दि. २/५/२०१९ पर्यंत करारावर सहया करण्याचे निर्देश देण्यात आले.

८. अपीलार्थी करारावर सहया करण्याऐवजी ते PDRO कडे ०५/०३/२०१९ च्या अर्जान्वये दि. २७/११/२०१८ च्या इरादा पत्रावर खालील अनुतोष मागण्यासाठी गेले.

   १. मेमो मधे (वाचा इरादा पत्रासह) दिल्याप्रमाणे चासकमान धरणाच्या खालच्या प्रवाहातुन पाणी देण्याऐवजी सरळ चासकमान धरणातुन पाणी देण्याचे प्रतिवादी क्र.१ ला निर्देश देण्यात द्यावेत.
   २. जे दर ग्रामपंचायत/नागरी स्थानिक संस्था/न. प. यांना घरगुती पाणी वापरासाठी लागु आहेत त्या दराने, महानगरपालिकेला लावायच्या ५ पट दराऐवजी, लावण्यासाठी निर्देश द्यावेत.
   ३. या अर्जाचा निकाल लागेपर्यत दि. १९/११/२०१८ च्या आदेशाला तसेच दि. २७/११/२०१८ च्या इरादा पत्राला स्थगिती आदेश द्यावा.

९. PDRO ने त्यांच्या २५/०४/२०१९ च्या आदेशाने मागितलेले अनुतोष नाकारुन प्रकरण निकालात काढले व त्यांनी म्हटले की जी प्रारंभिक परवानगी राज्य शासनाने २४/०७/२००८ च्या पत्रावर, व त्या आधारावर दिलेला दि. ०६/०९/२००८ च्या मेमो आहे, ते आधीच व्यपगत झाल्यामुळे व नवीन करार पत्र करुन ते कार्यान्वित न केल्यामुळे, हे प्रकरण निकालात काढले. PDRO पुढे म्हणाले की कथित मंजुरी मधील अटी आणि शासनाने दिलेल्या मुळ मंजुरीच्या अटी व शर्तीच्या विरोधात जाऊन, अनुतोषाला मंजुरी देता येणार नाही. त्याप्रमाणे PDRO ने, कागदपत्रांच्या पुराव्याच्या आधारावर जे त्यांच्या आदेशात दिले आहेत, व त्या प्रती आदेशात जोडल्या आहेत, अपीलार्थीचा अर्ज निकालात काढला.

१०. त्यामुळे अर्जदाराने PDROच्या २५/०४/२०१९ च्या आदेशाने व्यथित होऊन मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम २२ खाली दि. २३/०५/२०१९ ला अर्ज प्राधिकरणाकडे दाखल केला आहे.

**प्रार्थनेचा सारांश**

११. अपीलार्थीने त्याच्या अपीलामार्फत प्राधिकरणाला खालील प्रमाणे अनुतोष देण्याची प्रार्थना केली आहे.

अ) PDRO चा दि. २५/०४/२०१९ चा आक्षेपित आदेश बाजुला काढावा.

ब) प्रतिवादी क्र. १ ला राज्य शासनाच्या नीतीप्रमाणे, मजनिप्राच्या आदेश लक्षात घेऊन, दरवर्षी १८ दलघमी पाण्याचे या प्रकल्पाकरिता, चासकमान धरणाच्या जलाशयातुन देण्याचे, प्रतिवादी क्र. १ ला निर्देश द्यावेत.

क) जर मा. प्राधिकरणाचा वरील ब) प्रमाणे अनुतोष देण्याचा विचार नसेल तर, मा. प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. १ ला निर्देश द्यावेत की, अपीलार्थीच्या अर्जाचा, कथित उर्जा निर्मितीची होणारी हानी आणि/किंवा प्रतिवादी क्र. २ ने कांही आक्षेप घेतला असेल, तर ते ध्यानात न घेता अपीलार्थीला त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन, शासनाचा दि. २१/०१/२००३ चा शासन निर्णय; त्याचप्रमाणे मुख्य अभियंता, सिंचन विभाग, पूणे यांनी त्यांच्या दि. १५/०७/२०१७ च्या पत्रात दिलेले निष्कर्ष व इतर लागु होणाऱ्या विधियुक्त तरतुदी हे सर्व लक्षात घेऊन, योग्य ते आदेश द्यावेत.

ड) जे दर ग्रामपंचायत/नागरी स्थानिक संस्था/न. प. यांना घरगुती पाणी वापरासाठी लागु आहेत त्या दराने, महानगरपालिकेला लावायच्या ५ पट दराऐवजी, लावण्यासाठी निर्देश द्यावेत.

इ) या अर्जाचा निकाल लागेपर्यंत दि. १९/११/२०१८ च्या आदेशाला तसेच दि. २७/११/२०१८ च्या इरादा पत्राला स्थगिती आदेश द्यावा. जे वरील आदेशाचे अनुसार दिले आहेत आणि प्रतिवादी क्र. १ ला निर्देश द्यावेत की त्यांनी या कथित इरादापत्रावर किंवा वरील १९/११/च्या आदेशावर ते व्यपगत झाल्याच्या कारणावरुन किंवा ते रद्द करण्याची कोणतीही कार्यवाही करु नये.

फ) आणखी असा कोणताही अनुतोष, जो योग्य वाटेल, द्यावा.

## प्राधिकरणासमोर चाललेले कामकाज

१२. अपील दाखल केल्यावर, त्यात प्राधिकरणाने ३ सुनावण्या दि. ०६/०८/२०१९, ०७/०१/२०२० व २७/०१/२०२०, घेतल्या त्यामधे सर्वांना बाजु मांडण्याची समन्यायी संधी त्यांच्या प्रकरणातील सादरीकरणाची, गुणवत्तेवर दिली.

**अ) दि. ०६/०८/२०१९ ला झालेल्या पहिल्या सुनावणीचा सारांशः—**

१३. या सुनावणीत अपीलार्थीचे प्रतिनिधी व ॲडव्होकेट आणि प्रतिवादी क्र. १ व २ चे प्रतिनिधी व ॲडव्होकेट हजर होते.

१४. ॲड. जतिन पोरे यांनी अपीलार्थी K E I P L मार्फत प्रकरणाची रुपरेषा थोडक्यात मांडली व सादर केले की, PDRO ने २४ एप्रिल २०१९ चा आदेश त्यांच्या दि. ०५/०३/२०१९ च्या अर्जावर/याचिकेवर सुनावणी न घेता काढला. पीडीआरओने त्याच्या आदेशात या परवानगी वर मधे पडण्यास आपली असमर्थतता व्यक्त केली कारण की, ही परवानगी ज. सं. विभागाच्या च्या मा. मंत्र्यांनी आणि म. कृ. खो. वि. महामंडळाच्या अध्यक्षांनी मजनिप्रा अधिनियम २०११ (सुधारणा व चालू ठेवणे) च्या १६ (ए) अंतर्गत दिली आहे.

१५. ॲड. जतिन पोरे पुढे म्हणाले की, राज्याच्या जल नीती मधे असिंचित पाण्याच्या पुरवठयासाठी सरळ पाईप लाईन घेण्यास पसंती दर्शवली आहे. ज. सं. विभागाच्या तपशीलवार विश्लेषनातुन दिसुन आले आहे की, ८.०३ दशलक्ष युनीट वीज निर्मिती विध्यांचल जल विद्युत लि. करणार आहे जर पाणी अपीलार्थीने सरळ चासकमान धरणातुन, त्याच्या खालच्या प्रवाहातुन घेण्याऐवजी, घेतले तर त्यात केवळ ०.०४ दशलक्ष युनिटची हानी होणार आहे;.

१६. प्राधिकाऱ्यांनी त्यांना ११/०७/२०१९ ला नोटीस दिल्यावरही, प्रतिवादी क्र. १ ने, उत्तर कां नाही दिले? अशी चौकशी केली असता याबाबत ॲडव्होकेट जे. एस. यादव म्हणाले की, ॲडव्होकेट विलास तपकीर , महाराष्ट्र कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ, प्रतिवादी क्र. १ चे मार्फत मांडतील व त्यासाठी उत्तर देण्याकरिता २ आठवडयाची मुदत देण्याची विनंती केली.

१७. ॲडव्होकेट श्रीमती. शिवांगी रे, अपीलार्थी (VHPL) चे ॲडव्होकेट, यांनी वकालतनामा सादर केला व प्रतिवादी क्र. २ ने शपथपत्र दाखल केले. त्याच्या प्रती अपीलार्थी व प्रतिवादी क्र. १ ला देण्यात आल्या.

१८. दोन्ही पक्षांनी केलेले युक्तिवाद, सुनावणीच्या वेळेस प्राप्त झालेली माहिती लक्षात घेऊन प्राधिकरणाने खालील निर्देश निर्गमित केले.

१) प्रतिवादी क्र. १ नी त्यांचे शपथपत्र २ आठवडयाच्या आत दाखल करावे व त्याच्या प्रति सर्व संबंधितांना द्याव्यात.

२) अपीलार्थी त्यावर आपले उत्तर, कांही असल्यास, २ आठवडयाच्या आंत, त्याच्या प्रती सर्व संबंधितांना देवून, दाखल करु शकतात.

३) वादातील सर्व पक्षकारांना निर्देश देण्यात आले की उर्जा निर्मितीसाठी व औद्योगिक वापराकरिता इष्टतम वापर कार्यक्षमतेने होण्याची योजना तयार करण्याची खात्री करतील व त्यावर आपली मते मांडतील.

**ब) दिनांक ०७ जानेवारी २०२० च्या दुसऱ्या सुनावणीचा सारांश**

१९. या सुनावणीत अपीलार्थींचे प्रतिनिधी व ॲडव्होकेट आणि प्रतिवादी क्र. १ व २ चे प्रतिनिधी व ॲडव्होकेट हजर होते.

२०. ॲडव्होकेट जतिन पोरे K E I P L मार्फत म्हणाले की, मागच्या सुनावणीत निर्देश दिल्याप्रमाणे, कांही पर्यायी मार्ग सापडु शकतो या विषयावर अपीलार्थी व प्रतिवादी क्र.२ यांच्या मधे कांही सभा झाल्यात, परंतु दोन्ही पक्ष निर्णयाप्रत पोहचु शकले नाही व असे ठरले की त्यांच्या वरिष्ठ प्रतिनिधी मधे सभेची आणखी एक फेरी व्हावी. अशाप्रकारे, त्यांनी विनंती केली ही सुनावणी थांबवावी. ते पुढे म्हणाले की, अपीलार्थींची मुख्य आशंका आहे की, त्यांना नियमितपणे पाण्याचा पुरवठा व्हावा आणि यासाठी ते धरणाच्या खालच्या प्रवाहात लहान साठवणीसाठी बांधकाम करु शकत नाही.

२१. प्रतिवादी क्र. २ चे प्रतिनिधी श्री. रामचंद्रन म्हणाले की, अपीलार्थी बरोबर झालेल्या सभेत असे दिसून आले की, त्यांच्या २ मुख्य आशंका १) पाणी दर आणि २) अबाधीत अखंड पाणी पुरवठा या आहेत. सर्व पाणी वीज केंद्रातुन जाण्यास हवे. जर अपीलार्थींना धरणातुन पाणी दिले तर त्याचा प्रभाव कमी वीज निर्मितीत दिसुन येईल.

२२. इंजिनियर बी. के शेटे, यांनी प्रतिवादी क्र. १ मार्फत सादर केले की, अपीलार्थींना प्राधिकरणाकडे अर्ज करण्याचा हक्क नाही कारण त्यांच्यात व प्रतिवादी क्र. १ मधे करार झालेला नाही व अशाप्रकारे त्यांनी केलेला अर्ज रद्द समजण्यात यावा. पुढे प्रतिवादी क्र. १ ला अपीलार्थींसाठी, जे पाणी कमीटमेंट चार्जेस न भरता, १८ दलघमी पाणी आरक्षित केले आहे, त्यामुळे त्यांच्या महसुली उत्पनाची हानी झाली आहे; जर करार झाला असता तर ते चार्जेस अपीलार्थींनी देणे भाग पडले असते.

२३. प्राधिकरणाने सुनावणी पुढे तहकुब करण्यास नकार दिला कारण त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ला महसुल उत्पनामधे हानी होते व प्राधिकरणाने असे मत व्यक्त केले की, अपीलार्थींकडे २ विकल्प आहेत, ते म्हणजे त्यांनी दुसऱ्या इनटेक ले आउट च्या प्रस्तावाशी दुसऱ्या पक्षांबरोबर १५ दिवसांच्या आत सहमती दर्शवावी किंवा प्रस्तुत अर्ज परत घ्यावा. जर त्यांना सहमती बनण्यास वेळ लागत असेल तर त्यांना नवीन अर्ज करण्याची स्वतंत्रता असेल. जर वादात असलेल्या पक्षांमधे अपीलार्थी दुसऱ्या इनटेक ले आउट च्या प्रस्तावाशी दुसऱ्या पक्षांबरोबर सहमती पुढच्या सुनावणी पर्यंत सहमती होवून उत्तर शोधु शकले नाही तर, प्राधिकरण, सर्वांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुर्ण संधी देवून, पुढची सुनवाणी घेऊन प्रस्तुत प्रकरणावर निर्णय घेईल. ॲड. जतिन पोरे यांनी यासाठी १५ दिवसांचा वेळ देण्याची विनंती केली.

२४. आता पर्यंत जे सादरीकरण या सुनावणीत केले, त्यावर विचार करुन प्राधिकरणाने निर्णय दिला की सर्व पक्षांनी एकत्रित बसुन या प्रश्नाचे तांत्रिक उत्तर शोधुन त्यावर सहमती बनवावी. प्रतिवादी क्र. १ हे अशा सभेचे संयोजन करतील, व सर्व पक्ष त्यात भाग घेतील. या अहवाल पुढच्या सुनावणीच्या पुर्वी प्राधिकरणाला दाखल करावा.

**क) तिसऱ्या व अंतिम दि. २७ जानेवारी, २०२० च्या सुनावणीचा सारांश**

२५. या सुनावणीत अपीलार्थींचे प्रतिनिधी व ॲडव्होकेट आणि प्रतिवादी क्र. १ व २ चे प्रतिनिधी व ॲडव्होकेट हजर होते.

२६. ॲड. विलास तपकीर, महाराष्ट्र कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ, पूणे मार्फत दि. १५ जानेवारी २०२० ला झालेल्या सभेचे कार्यवृत्त सादर करुन सांगितले की, सभा, वैकल्पिक उत्तरावर कांही निर्णय न झाल्याने तहकुब करण्यात आली होती. तथापि, K E I P L करिता ॲडव्होकेट जतिन पोरे म्हणाले की ते अनुच्छेद ९ (ब) व अनुच्छेद १० च्या या सभेच्या कार्यवृत्ताशी ते सहमत नाही.

२७. ॲड. प्रदीप देशमुख, K E I P L अपीलार्थी मार्फत यांनी विशेषत्वाने सांगितले की PDRO ने निर्णय घेण्याची प्रक्रिया योग्य रितीने पाळली नाही व त्यांनी न्यायीकवत अधिकाऱ्याचे कर्तव्य देखील पाळले नाहीत. अपीलार्थीने २०१४ मधे प्रतिवादी कडे १८ दलघमी पाण्यासाठी, ज्याला राज्य शासनाने २००८ मधे शासनाने खेड सिटी, विशेष आर्थिक क्षेत्र मंजुरी दिली होती, त्या आधारावर मागणी केली होती. त्यांनी प्रतिवादी क्र. १ नी अपीलार्थीच्या प्रस्तावावर प्रतिवादी क्र. २ चे मत मागवले त्यावर देखील आक्षेप घेतले, ज्याची त्यांच्या मते गरज नव्हती.

२८. ॲड. प्रदिप देशमुख, समोर म्हणाले की, राज्य शासनाने क्षेत्रीय वाटप निश्चित केले आहे. प्रतिवादी क्र. २ हे त्याप्रमाणे ७५ % पाणी सिंचनासाठी देत आहेत व अपीलार्थी ने त्यांच्याकडे असिंचन कोटयातुन मागणी केली आहे. राज्य शासनाने ६–७ असिंचित आरक्षण चासकमान धरणातुन मंजुर केले आहेत. प्राधिकरणाने पाणी वाटप करताना प्रतिवादी क्र. २ चे लक्ष वेधुन त्यांना सांगितले आहे की, प्रकल्प अहवालाप्रमाणे या धरणाचे सर्व पाणी केवळ सिंचनासाठी आरक्षित आहे.

२९. ॲड. प्रदिप देशमुख पुढे म्हणाले की, PDRO हे मजनिप्रा अधिनियमाचे अन्वये स्थापित झाले असल्याने त्यांनी योग्य ती सुनावणी घेऊन प्रकरण निकालात काढावे. तथापि, अपीलार्थीचे प्रकरणात PDRO ने सुनावणी न घेता जी कागदपत्रे त्यांच्याकडे होती त्यावर एकतर्फीपणाने विश्वास ठेवून, त्यांचा संदर्भ देवून प्रकरण निकालात काढले. त्यांनी उच्चाधिकार समितीचे दुय्यम म्हणुन काम केले जेंव्हा त्यांना न्यायिकवत प्रधिकारी म्हणुन काम करायला हवे होते;

व त्यांनी जी सत्यस्थिती होती त्यावर स्वतंत्रपणे विचार केलेला नाही. अशाप्रकारे नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन झाले नाही आणि म्हणुन त्यांनी विनंती केली की PDRO चे दि. २५/०४/२०१८ चे आदेश रद्द ठरवुन, प्रकरण पुन्हा PDRO कडे ताज्या सुनावणी करिता पाठवावे. प्राधिकरणाने याची नोंद घेतली की PDRO ने आदेश, अपीलार्थींचे म्हणणे ऐकुन न घेता, सुनावणी न घेता, केवळ समोर आलेल्या कागदपत्रांवर विसंबुन, जारी केले आहेत.

३०. ॲड. विलास तपकीर, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे प्रतिवादी क्र. १ तर्फे म्हणाले की, कार्यकारी अभियंता, चासकमान सिंचन विभाग, पूणे त्यांचे दि. २७/११/२०१८ पत्राने इरादापत्र अपीलार्थीला सहया करुन कार्यान्वित करण्यासाठी पाठवले होते. तथापि, अपीलार्थींने आजपर्यंत ही कार्यवाही पुर्ण केली नाही. अशाप्रकारे ते ज. सं. विभागाचे ग्राहक नाहीत. त्यामुळे मजनिप्रा (कामकाज चालविणे) नियमन, २०११ च्या अनुच्छेद ११ प्रकारे अपीलार्थींचे अपील, ते अपील करण्यासाठी पात्र नसल्यामुळे, त्यांच्या बरोबर विधिवत बंधनकारक करार अस्तित्वात नसल्यामुळे त्यांचे अपील दाखल करुन घेण्या योग्य नाही.

३१. ॲड. श्याम देवानी, व्हीएचपीएल, प्रतिवादी क्र. २ चे तर्फे सादर केले की, जर जलाशयातुन सरळ सोडले तर लघुजल प्रकल्प त्यामुळे बाधित होईल. त्यांनी याकडे लक्ष वेधले की, लघुजल उर्जा प्रकल्पाची रचना अशाप्रकारे कार्यान्वित केली आहे की, ज्यामधे नदी प्रवाहाचे पाणी प्रकल्पात येते व वीज निर्मिती झाल्यावर ते सिंचनासाठी सोडल्या जाते. ते पुढे म्हणाले की जर पाणी खालच्या प्रवाहातुन, मेमोरँडम व इरादा पत्रा प्रमाणे, प्रकल्पाकरिता उचलले तर त्यामुळे अपीलार्थी पुर्वग्रह दुषित होणार नाही. त्यांनी आपले मत सांगितले की, प्रकरण PDRO कडे पाठवण्यास त्यांचा आक्षेप नाही. मुख्य मुद्दा १८ दलघमी पाणी घेण्याबद्दल नसुन, ते कोणत्या स्थळापासून उचलावे हा मुद्दा आहे. जर प्राधिकरण प्रकरण PDRO कडे पाठवते तर हे सर्व मुद्दे चर्चेसाठी खुले राहतील; आणि प्राधिकरणाने मुद्दे साचेबध्द करावे ज्यावर PDRO ने सुनावणी घ्यावी.

३२. ॲड. जतिन पोरे यांनी अपीलार्थी मार्फत सांगितले की, जर अपीलार्थी करारात सामील झाले तर त्यांना त्यावर आक्षेप घेता येणार नाही. आणि अशाप्रकारे अपीलार्थींना करार करण्यास बाध्य करता येणार नाही. मजनिप्रा (कामकाज चालु ठेवणे) नियमन, २०१३ च्या कलम ११ (सी) प्रमाणे अपीलार्थी अपील दाखल करण्यास पात्र आहे. कलम ११ (सी) मधे वापरकर्ते या संज्ञेला व्यापक अर्थ आहे, ज्यामधे भविष्यातील किंवा संभवनिय वापरकर्ता हा अर्थ देखील समाविष्ट आहे.

३३. सर्व पक्षांचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्राधिकरणाने सुनावणीचे कामकाज आदेश देण्याकरिता थांबवले.

## मुद्दे सांचेबध्द करणे

३४.अपीलात दिलेल्या गोष्टींचा तसेच सर्व पक्षांनी केलेल्या सादरीकरणाचा व अभिलेखातील कागदपत्रांचा विचार करुन प्राधिकरणाने खाली दिलेले संबंधित मुद्दे विचारार्थ तथा निवाडा करण्यासाठी साचेबध्द केले आहेत.

**(१) PDRO ने दि. २५/०४/२०१९ चा आक्षेपित आदेश कोणाला संधी न देता व नैसर्गिक न्यायतत्वाचे पालन करता काढला आहे काय?**

**(२) आक्षेपित आदेश रद्द ठरवावा काय?**

**(३) कोणता एखादा योग्य आदेश काढण्याची गरज आहे काय?**

**प्राधिकरणाचे निष्कर्ष**

३५. या वादामधे केलेला युक्तिवाद, सादरीकरण व अभिलेखात असलेल्या पुराव्याचा विचार करुन प्राधिकरणाने वरील मुद्यांवर निवाडा दिला आहे. प्राधिकरणाचे या मुद्यांवरील निष्कर्ष असे आहेत.

**(१) PDRO ने दि. २५/०४/२०१९ चा आक्षेपित आदेश कोणाला संधी न देता व नैसर्गिक न्यायतत्वाचे पालन करता काढला आहे काय?**

अ) त्यांचा आक्षेपित आदेश वाचून लक्षात येते की, पीडीआरओ ने, प्रकरणावर निर्णय देतांना कामकाज प्रक्रियेमधे चुका केलेल्या आढळतात. त्यांनी सुनावणी न घेता दि. २५/०४/२०१९ चा आदेश जारी केला. त्यांनी वादामधील सर्व बाजुंना सुनावणीची वाजवी संधी द्यायला पाहिजे होती. अशारितीने नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन केले नाही.

ब) यामधे पुढे असे आढळुन आले की, अपीलार्थीचे म्हणण्यानुसार, PDRO ने २४ एप्रिल २०१९ चा आदेश त्यांच्या दि. ०५/०३/२०१९ च्या अर्जावर/याचिकेवर सुनावणी न घेता काढला. पीडीआरओने त्याच्या आदेशात या परवानगी वर मधे पडण्यास आपली असमर्थतता व्यक्त केली कारण की, ही परवानगी ज. सं. विभागाच्या च्या मा. मंत्र्यांनी आणि म. कृ. खो. वि. महामंडळाच्या अध्यक्षांनी मजनिप्रा अधिनियम २०११ (सुधारणा व चालु ठेवणे) च्या १६ (ए) अंतर्गत दिली आहे, जे निराधार आहे. प्राधिकरणाचे मत आहे की, जो अर्ज PDRO समोर होता तो कार्यकारी अभियंत्याने जारी केलेल्या इरादापत्राच्या विरोधात होता. हे इरादापत्र म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे यांनी दिलेल्या मुळ परवानगीतील अटी व शर्तीवर आधारित होते. अशारितीने पाण्याचा स्त्रोत नदीच्या खालच्या प्रवाहातुन आहे हा मुद्दा मुळ परवानगी नुसार आहे. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी कर्तव्याप्रती जागरुकता दाखवून मुळ परवानगीतील अटी व शर्ती इरादापत्रात दिल्या. अशाप्रकारे PDRO ने या मुद्यावर इरादा पत्र जे जारी झाले आहे ते मुळ परवानगीवर आधारित आहे यावर विसंबुन निर्णय घेतल्यामुळे अपीलार्थीने पुर्वग्रह बाळगण्याचे कारण नव्हते. अधिक सांगायचे म्हणजे म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे यांनी दिलेली मुळ परवानगी कधीच वादात नव्हती; त्याला आव्हान दिलेले नाही. अशाप्रकारे न्यायिकवत प्राधिकारी म्हणुन, म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे यांच्या निर्णयाचे गुणवत्तेने मुल्यांकन करुन त्याची योग्यता ठरवणे हे PDRO च्या कार्यक्षेत्रात व त्यांना प्रदान केलेल्या अधिकारात येत नाही; कारण त्यांच्यासमोर केवळ इरादापत्र,

जे कार्यकारी अभियंताने जारी केलेले, होते. अपीलार्थी जर म. कृ. खो. वि. महामंडळ, पूणे मुळे व्यथित झाले होते तर त्यांनी संबंधित प्राधिकाऱ्याकडे त्या अटी व शर्ती बदलून घेण्यासाठी जायला पाहिजे होते. परंतु या प्रकरणामधे असे न करता, अपीलार्थीने इरादापत्रावर मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम २२ (१) अन्वये PDRO ला आव्हान दिले व आता मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम २३ (३) प्रमाणे प्राधिकरणाकडे अपील केले आहे. अशाप्रकारे PDRO ने वर केलेल्या मुल्यांकनात प्राधिकरणाला काहीही गैर वाटत नाही.

**अशाप्रकारे या मुद्यांवरील पहिल्या भागाचे उत्तर होकारार्थी येते.**

**(२) आक्षेपित आदेश रद्द ठरवावा काय?**

प्राधिकरणाला आढळुन आले की, PDRO ने नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन केले नाही कारण त्यांनी अपीलार्थींना सुनावणीची संधी दिलेली नाही. त्यामुळे प्राधिकरणाला विचारांती असे वाटते की, PDRO ने दिलेला आक्षेपित आदेश बाजुला ठेवावा आणि ताज्या निवाडयासाठी परत त्यांच्याकडे पाठवावा.

**अशाप्रकारे या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी येते.**

**(३) कोणता एखादा योग्य आदेश काढण्याची गरज आहे काय?**

अ) या अर्जाचा निकाल लागेपर्यत दि. १९/११/२०१८ च्या आदेशाला तसेच दि. २७/११/२०१८ च्या इरादा पत्राला स्थगिती आदेश द्यावा, जे वरील आदेशाचे अनुसार दिले आहेत आणि प्रतिवादी क्र. १ ला निर्देश द्यावेत की त्यांनी या कथित इरादापत्रावर किंवा वरील १९/११/२०१८च्या आदेशावर ते व्यपगत झाल्याच्या कारणावरुन किंवा ते रद्द करण्याची कोणतीही कार्यवाही करु नये, अशी प्रार्थना अपीलार्थीने केली आहे.

ब) कार्यकारी अभियंतानी दि. २७/११/२०१८ ला इरादा पत्र अपीलार्थींना जारी केले. या इरादापत्राद्वारे अपीलार्थींना मुख्य अभियंताने मेमो दिल्यापासुन ६ महिन्याच्या आत

म्हणजे, दि. २/५/२०१९ पर्यंत करारावर सह्या करण्याचे निर्देश देण्यात आले. PDRO ने त्यांच्या आदेशात म्हटले आहे की, अपीलार्थीला दिलेली ही परवानगी, जर ते सिंचनाचे रीस्टोरेशन चार्जेस भरत नाही आणि इरादा पत्र जारी केल्याच्या तारखेपासुन ६ महिन्याच्या आत करारावर सहया करणार नाहीत तर, आपोआप व्यपगत होईल.

क) ही सहा महिन्यांची मुदत २६ मे २०१९ ला संपलेली आहे. तथापि, त्याच्यापुर्वी अपीलार्थीने त्यांचे अपील २२ मे २०१९ ला दाखल केले आहे. त्यामुळे प्राधिकरणाचे विचारांती असे मत आहे की अपीलार्थी ला प्रतिवादी क्र. १ च्या कोणत्याही दमनकारी कार्यवाही पासुन, जो पर्यंत हया प्रकरणावर PDRO अंतिमत: निर्णय घेत नाही तो पर्यंत, संरक्षण देण्यात यावे.

**अशाप्रकारे विचारार्थ असलेल्या या मुद्यांचे उत्तर आहे.**

## निर्देश

३६. या वादामधे केलेला युक्तिवाद, सादरीकरण व अभिलेखात असलेल्या पुराव्याचा विचार करुन प्राधिकरणाने वरील मुद्यांवर निवाडा दिला आहे. जे मुद्दे वर साचेबध्द केलेले आहेत त्यावर, ..... प्राधिकरण खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

१) अर्ज गुणवत्तेवर करण्याच्या ताज्या निवाडयाकरिता परत पाठवित आहे. PDRO वादातील सर्व बाजुंना त्यांचे म्हणणे सुनावणी दरम्यान मांडण्याची वाजवी व पुर्ण संधी देतील; ज्यात प्रतिवादी क्र. २ सुध्दा समाविष्ट आहे. PDRO समोर रास्त न्याय चौकशी होण्यासाठी सर्व वादातील पक्षकारांना मोकळीक आहे की ते या वादात कोणतेही कागदपत्र/पुरावा PDRO समोर ठेवतील ज्यावर PDRO विचार करतील. हे कामकाज PDRO या आदेशाच्या तारखेपासुन ६ महिन्याच्या आत पुर्ण करतील.

२) प्रतिवादी क्र. १ किंवा इतर कोणतेही अधिकारी जे त्यांच्या प्रती जबाबदार आहेत ते अशी कोणतीही दमनकारी कार्यवाही, अपीलार्थी व प्रतिवादी क्र. २ वर, जोपर्यंत PDRO या प्रकरणावर निर्णय देत नाही, तोपर्यंत, करणार नाहीत.

अपील अशा तऱ्हेने, खर्चाविना, निकालात काढले आहे.

१३ मे २०२० ला जारी केले.

| | | |
|---|---|---|
| स्वा. | स्वा. | स्वा. |
| (डॉ. एस. टी. सांगळे) | (विनोद जे. तिवारी) | (व्ही. एम. कुळकर्णी) |
| सदस्य (ईकानॉमिक्स) | सदस्य, (विधि) | सदस्य (ज. सं. अभियांत्रिकी) |

स्वा.
(के. पी. बक्षी)
अध्यक्ष

स्वा. १३/५
(डॉ. रामनाथ सोनवणे)
सचिव